म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. ५४९
१९२०
REFBK-0001820
REFBK-0001820

ग्रं. सं. ठाणें
काव्य
पु८२

॥ श्रीविठ्ठल ॥

# भक्ति-सुधा.

दा. क्र १८२०



रचनाकार

शंकर श्रीधर धनेश्वर.

सन १९२०

पुणें येथें 'यशवंत' छापखान्यांत छापिलें.

स्थळप्रत
ॐ ग्रं. सं. डाबें.

काव्य.
२२१

॥ श्रीरुक्मिणीकांत प्रसन्न ॥

# भक्ति-सुधा.

आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावें ॥
तोषोनि मज द्यावें । पसायदान हें ॥ १ ॥
—श्रीज्ञानेश्वर.

रचनाकार व प्रकाशक
शंकर श्रीधर धनेश्वर,
मु. कडा, जि. अहमदनगर.

मुद्रक
अच्युत चिंतामण भट,
यशवंत प्रेस, ३७ शनवार पेठ, पुणें शहर.

( सर्व हक्क स्वाधीन. )

शके १८४१, सन १९२०.

किंमत ४ आणे.

REFBK-0001820
REFBK-0001820

## —समर्पण—

(आर्या.)

गणेशशास्त्री नामें,
    नारायण बालकृष्ण विख्यात;
वैयाकरणी बुधवर,
    साधुजनोचित उदात्त यच्चरित, १

तच्चरणीं मी विनयें,
    प्रस्तुत कृति अर्पितों मनोभावें;
देवा मम या मित्रा,
    दृढयशबलआयुसौख्य बहु द्यावें. २

शंकर श्रीधर धनेश्वर.

१८२०

# प्रस्तावना.

१ रा. रा. शंकर श्रीधर धनेश्वर यांच्या स्फुट कवितेचा हा संग्रह ( भक्ति-सुधा ) पुस्तकरूपानें मराठी वाचकांच्या हातीं पडण्याचा योग आला आहे, याबद्दल मला समाधान वाटतें. यांत २४ लहान लहान प्रकरणें असून त्यांपैकीं १७ प्रकरणें 'मुमुक्षु' पत्रांत छापलीं आहेत. यामुळेंच मला वाटतें, या संग्रहास प्रस्तावना लिहून देण्याचा प्रेमाग्रह रा. धनेश्वर यांना मला करावासा वाटला. प्रेमाचा आग्रह मान्य केलाच पाहिजे. प्रेमांत एवढी शक्ति आहे. उपचाराग्रह डौलाचे असले तरी ते जाचक वाटतात; प्रेमाचा आग्रह–त्यापुढें स्वतःचा आग्रह टिकत नाहीं! मी कवि म्हणून लोकांत प्रसिद्ध नाहीं, असें असून एका कवीच्या कवितेला प्रस्तावना लिहिण्याचा स्वतः कवि मला प्रेमाग्रह करीत असतांना हें स्वल्पही कार्य माझ्या हातून झालें नाहीं, तर कवि तर दूरच राहो–पण रसिक म्हणून घ्यावयाचाही मला अधिकार राहिला नाहीं, असें कविमंडळानें ठरविलें तर पंचाईत पडायची. म्हणून मी या चार ओळी येथें लिहीत आहें.

२ रामजोशीबोवांनीं एका लावणींतः—

कवितारस मनांत झडकरि यावा । पुण्याचा ठेवा ॥

असें म्हटलें आहे. कवीच्या किंवा रसिकाच्या मनांत कवितारस चटकन् उतरावा ही मोठ्या पुण्याईची गोष्ट आहे, असें रसिक कविवर रामजोशी सांगतात. कवि आणि रसिक यांच्यांत फारसा भेद नाहीं. चतुर्दशीचा चंद्र आणि पूर्णिमेचा चंद्र यांच्यांत जेवढा फरक आहे, तेवढाच या दोघांत आहे. रसिकांची काहीं निराळी खाण नाहीं. कवि आणि रसिक हे दोघे एकाच खाणींत जन्मतात. दोघांची जन्मरास, जन्मनक्षत्र एकच असतें. एकाचें यश भूवर फांकायचा योग असतो, दुसऱ्याचा नसतो. कवितारस झडकरि मनांत येणें हा योग मात्र दोघांच्या पत्रिकेंत समानच असतो, आणि यामुळें दोघां-

चाही कवितारसजन्य आनंदानुभव एकच असतो. कवि हा रसिक असल्या-वांचून कविच होत नाहीं, आणि रसिकास काव्य लिहितां आलें नाहीं तरी त्याच्या अंतःकरणांत तें असतेंच. रसिकाच्या कवित्वाचा स्फोट होत नाहीं. कवीचें रसिकत्व आंत कोंडून रहात नाहीं, त्याला वाचा फुटते. तें बाहेर पडल्याशिवाय कवीला चैनच पडत नाहीं. मग तें काव्य कोणी वाचो किंवा न वाचो, तें प्रसिद्ध होवो वा न होवो, लोक त्याला बरें ह्मणोत वा वाईट म्हणोत—याची कवीला फिकीर नसते. लोकांसाठीं तो लिहीतच नाहीं. केवळ स्वात्मारामाला संतोष देण्यासाठीं तो तें लिहितो, किंवा तें त्याच्या-कडून लिहविलें जातें. कित्येक कवि स्वतःचे उद्गार काव्यांत लिहून तें आप-णच वाचतात आणि फाडून टाकतात. पैठणास अनंतनाथ ब्रह्मचारी म्हणून एक सत्पुरुष ३०।४० वर्षांपूर्वी झाले. त्यांनीं हजारों अभंग लिहिले आहेत, पण हे छापायला देऊं नका असें शिष्यांस बजावून ठेवलें आहे! आपला आनंद भोगायला कोणी एक किंवा अनेक जोडीदार भेटले तरी कवीचें त्यांत कांहीं जात नाहीं. पण स्वतःला समाधान झालें, स्वतःच्या अंतःकरणांत असलेल्या भावनांना मूर्तस्वरूप प्राप्त झालेलें पाहिलें म्हणजे मनुष्याला आपलें प्रतिबिंब आरशांत किंवा आपल्या लेंकरांत पाहून जसा आनंद होतो तसाच याचा होतो. येथेंच त्या कवितेचें—जनकाला सुखानुभव देणें हें-कार्य संपलें.

३ मम्मटानें काव्यप्रकाशांत कविता कोणकोणत्या हेतूंस्तव जन्मास येते हें सांगितलें आहे. हे हेतु त्यानें पांच दिले आहेत. (१) कित्येक कवि यशासाठीं, आपली अजरामर कीर्ति व्हावी यासाठीं काव्यें लिहितात. कालि-दासादिकांचे ग्रंथ यशासाठीं लिहिलेले आहेत. रघूंचें यश गायला कवि लागला, तरी 'परगुणकथनैः स्वान्गुणान्ख्यापयन्तः' या न्यायानें स्वतः त्याचेंच यशोवर्धन झालें आहे. (२) दुसरे कांहीं कवि द्रव्यार्जना-साठीं काव्यें लिहितात. हा हेतु अगदींच गौण आहे. (३) तिसरा हेतु जनतेस व्यवहार शिकवण्याचा असतो. हितोपदेश-पंचतंत्रादिकांच्या कर्त्यांचा

हाच हेतु होता. ( ४ ) चवथा हेतु ह्मणजे कांहीं अमंगळ किंवा अरिष्ट प्राप्त झालें असतां तन्निवारण करणें हा होय. बाणभट्ट कवीचा मेहुणा मयूर यानें कुष्टरोगानें शरीर ग्रासलें असतां सूर्याराधनेस्तव सूर्यशतक लिहिल्याचें प्रसिद्ध आहे. आणि ( ५ ) पांचवा हेतु म्हणजे काव्य रचतांरचतां मनाला जो आनंदानुभव होतो तो होय. असे काव्यरचनेचे पांच हेतु आहेत.

४ आतां या दृष्टीनें महाराष्ट्र कवितेकडे पहिलें, तर बहुतेक प्राचीन कविता साधुसंतांनीं लिहिली असल्यामुळें ती भगवत्प्रीत्यर्थ व जीवोद्धाराचे कळवळ्यानेंच लिहिली आहे असें दिसून येतें. मराठी कविता बहुधा भक्तिरसप्रधान आहे, व जी अशी आहे ती सिद्धांची वाणी आहे. तामस जीवांच्याही मनाला सात्विकरसाचा पान्हा फोडूं, श्रवणाबरोबर समाधिसुख देऊं, गीतार्थानें विश्व भरून आनंदाच्या आवारांत सारें विश्व घेऊं, परतत्व डोळा दाखवूं, ब्रह्मानंदानें विश्व भरून टाकूं, अशा अधिकारानें ज्ञानेश्वरमहाराजांनीं ज्ञानेश्वरी ग्रंथ ( अ. ११ ) जगाच्या हातीं दिला आहे:—

खेचराचियाही मना । आणी सात्विकाचा पान्हा ।
श्रवणासवें सुमना । समाधि जोडे ॥ ११६० ॥
तैसा वाग्विलासविस्तारू । गीतार्थेंसीं विश्व भरूं ।
आनंदाचा आवारू । मांडूं जगा ॥ ११६१ ॥
फिटो विवेकाची वाणी । हो काना मना जिणी ।
देखो आवडे तो खाणी । ब्रह्मविद्येची ॥ ११६२ ॥
दिसो परतत्व डोळां । पाहो सुखाचा सोहळा ।
रिघो महाबोधसुकाळा- । माजी विश्व ॥ ११६३ ॥

ह्याच बैठकीवरून श्रीनाथमहाराज, तुकोबाराय, समर्थ इ० भगवद्भक्तांची कविता निर्माण झाली आहे. ही सिद्धपुरुषांची वाणी आहे. मोरोपंत व विठोबाअण्णा कऱ्हाडकर यांनीं मुमुक्षुत्वाच्या भूमिकेवरून आपली कविता लिहिली आहे. तथापि त्यांच्या वाणींत अद्भुत प्रेम, प्रसाद व प्रतिभा स्पष्ट असल्यामुळें त्यांच्या कवितेची योग्यताही असाधारण आहे.

५ सिद्धांचा अधिकार, त्यांची जीवोद्धाराची कळकळ, त्यांजवरील भगवत्प्रसाद हें सर्व अलौकिक असल्यामुळें त्यांच्या पायरीस इतर कवि केव्हांही पोंचणार नाहींत. मुमुक्षूंचेही तीव्र, मध्यम व मंद असे तीन प्रकार आहेत. त्याप्रमाणें तीव्र मुमुक्षूची वाणी मध्यम मुमुक्षूच्या वाणीपेक्षां निखालस श्रेष्ठ प्रतीची असते, व मंद मुमुक्षूपेक्षां वरील दोन्ही प्रकारच्या मुमुक्षूंच्या वाणींत कांहीं विशेष प्रकारची ज्योत असते. आतां आकाशाचा अंत लागत नाहीं, तरी शक्त्यनुसार पक्षी गगन-विहार करीतच असतात; त्याप्रमाणें सर्वांना काव्यगगनांत आपापल्या मगदुराप्रमाणें उडया मारायला वाव आहे. वाचक त्या उडयांवरून त्या त्या कवीचा अधिकार ठरवीत असतात. देवाला आळवायचा सर्व जीवांस अधिकार आहे. कारण परमात्मा सर्व जीवांचा मायबाप आहे. 'वेडें वाकुडें गाईन। परि मी तुझा म्हणवीन' असें तुकोबांबरोबर तुम्हांआम्हांलाही म्हणायला कांहीं हरकत नाहीं. कारण सर्वांच्या प्रेमाची पारख त्या विश्वात्म्याला आहे. कवितेंत रस किती आहेत, अलंकार किती आहेत, कविता ठाकठिकीची आहे कीं नाहीं, कवि विद्वान् आहे कीं अविद्वान् आहे, त्याचें भाषाप्रभुत्व कोणत्या दर्ज्याचें आहे, इ०. लौकिक गोष्टींकडे वाचक वेगवेगळया दृष्टीनें पाहणारे सांपडतील. परमात्म्याची दृष्टि मात्र एकच आहे—यांत खरा कळवळा आहे कीं नाहीं?

६ रा. धनेश्वरांचीं या पुस्तकांतील प्रकरणें पाहतां, तीं देवाच्या प्रेमानें, साध्याभोळया वाणीनें स्वतःच्या समाधानासाठीं गाइलेलीं गीतें आहेत, असें कोणासही आढळून येईल. व त्यास तीं वाचतां वाचतां समाधान वाटेल यांत शंका नाहीं.

पौष वद्य १ शके १८४१.
मुमुक्षुकचेरी—पुणें.

लक्ष्मण रामचंद्र पांगारकर.

———

# हृद्गत.

आपुलिया बळें, नाहीं मी बोलत ।
सखा भगवंत, वाचा त्याची ॥

—श्रीतुकाराम.

सुमारें तेरा वर्षांपूर्वी लौकिक विद्यार्जनानिमित्त कांहीं वर्षें पंढरींत वास करण्याचा योग श्रीपांडुरंगकृपेनें मला लाभला. पंढरी–विठूची पुरी, साधु, महात्मे यांचें माहेरघर आहे. भगवन्नामभजनानंद पंढरीसारखा अन्यत्र क्वचित् असेल. अंगीकृत व्यवसाय संभाळून विठोबारायाच्या मंदिरांत भजनश्रवणास जाण्याचा मला विशेष नाद लागला. कित्येक सुटीच्या दिवशीं भजनश्रवणांत बालछंदानुसार तल्लीन झाल्यामुळें मला जेवणाचेंहि भान रहात नसे. ज्या दिवशीं अशी स्थिति होई, त्या दिवशीं विठ्ठलरायाची मनोहर धवधवीत मूर्ति नेहमीं सन्मुख आहे, असा मनाला भास होत असे व तिला उद्देशून कांहीं तरी करुणापर–धांवा, पद्य, श्लोक, आर्या करण्याचा प्रयत्न माझेकडून अनायासें होई. ही आर्या किंवा पद्य तात्कालिक स्फूर्तीचें–प्रेमाचें–असल्यामुळें तें तयार होण्यास जितका अल्प काल लागे तितक्याच अल्पावकाशांत प्रायः त्याचें विस्मरण–दुसऱ्या अभ्यासाच्या उपाधीमुळें–होत असे. तथापि हा पद्यरचनेचा नाद मला दिवसेंदिवस वाढत्या प्रमाणावर लागत चालला. प्रस्तुत पुस्तक हें त्या नादाचेंच दृश्यफल आहे.

या ( भक्तिसुधा ) संग्रहांतील पंचवीसपैकीं तेवीस कविता नियतकालि

कांतून वेळोवेळीं प्रसिद्ध झाल्या आहेत. कविता ज्या नियत-कालिकांतून प्रसिद्ध झाली, त्या नियतकालिकाचें नांव व प्रसिद्धिकाल अनुक्रमणिकेंत दिला आहे. चोविसावी व पंचविसावी कविता नुक्तीच तयार केली आहे. तयार केली आहे नव्हे, ईशकृपेनें झाली आहे.

प्रस्तुत संग्रहांतील कवितांचा परिपाक कसा साधला आहे, याचा निर्णय करण्याचें कार्य रसिक वाचकांचें आहे, माझें नाहीं; तें ते करतीलच.

कोणत्याही प्रकारची विद्वत्ता (लेखकास अथवा कवीस लागणारी) अंगीं नसतां विद्यमान सुधारणाकाळांत 'कवि' या नांवानें पुढें येण्याचें मीं साहसच केलें आहे, असें कित्येकांस वाटण्याचा संभव आहे; नव्हे मला स्वतःलाच तें वाटत आहे. हें माझें काम—जगांत पुढें येण्याची ही माझी हांव—" प्रांशुलभ्ये फले लोभादुद्बाहुरिव वामनः—" प्रमाणें हास्यास्पद होईल. तथापि " कां न सदन बांधावें, कीं त्यांत पुढें बिळें करिल घूस !" असा विचार मनांत येऊन व " आकाश-अंत न कळोनिहि अंतरिक्षीं, आकाश आक्रमिति शक्त्यनुसार पक्षी " या न्यायानें पुढें येण्याचें कार्य मजकडून घडून आलें !

प्रस्तुत पुस्तकासंबंधीं विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे महान् भगवद्भक्त रसिकवर लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए. संपादक " मुमुक्षु," यांनीं या पुस्तकास लिहिलेली सुंदर, विद्वत्तापूर्ण व नव्या जुन्या मतांस पटणारी मार्मिक प्रस्तावना ही होय. रा. पांगारकर हे उत्कृष्ट व प्रेमळ कवि आहेत ही गोष्ट मी सांगणें म्हणजे काडवातीच्या उजेडानें विश्वनेत्र सहस्ररश्मी सूर्य दाखविण्यासारखेंच आहे! प्रस्तावना लिहिण्याचें कार्य ह. भ. पांगारकर यांनीं किती सौजन्यानें व प्रेमळपणानें केलें आहे, हें मार्मिक वाचकांस प्रस्तावना वाचून कळून येईल. निसर्गतः सुंदर अशा, धनिकाच्या मुलास कडेवर घेण्याची प्रवृत्ति पुष्कळांची असते; तथापि साधारण स्वरूपाच्या व दरिद्री जनाच्या मुलास प्रेमानें खांद्यावर घेऊन त्याचें कौतुक करण्याची

ह. भ. पांगारकरांची प्रवृत्ति, त्यांच्या विद्याविनयशील साधुवृत्तीस निःसंशय भूषणप्रद व वर्ण्य आहे. ही प्रस्तावना लिहून दिल्याबद्दल ह. भ. पांगारकरांचा मी आजन्म ऋणी आहें.

दुसरी महत्वाची गोष्ट ज्यांनीं थोरपणानें ह्या पुस्तकाची हस्तलिखित प्रत आपला अमोल काल फोल करून वाचली व प्रस्तुत पुस्तकावर आ-गाऊ अभिप्राय कृपापूर्वक पाठविले, त्यांचा साभार नामनिर्देश करणें ही आहे. ( १ ) 'मुमुक्षू–' तील प्रसिद्ध व महानुभाव वेदांतलेखक ह. भ. 'गोविंदसुत' ऊर्फ परशुराम गोविंद चिंचाळकर यांच्या अभिप्रायानें शीघ्रकोपी आधुनिक कवींना वाईट वाटेल. परंतु कवीचें महत्त्व किती थोर आहे हें विचारवान् मार्मिक वाचकांस या अभिप्रायावरून स्पष्टपणें समजेल. ( २ ) कविवर "अनंततनय" यांनीं वेळ नसतां कच्ची प्रत लक्ष-पूर्वक वाचून योग्य त्या सुधारणा करण्यास कळविलें व मार्मिक अभिप्राय पाठविला. ( ३ ) विद्वद्वर सज्जन दत्तात्रेय परशुराम चिंचाळकर, बी. ए. एल्. एल्. बी. यांनीं मूळ प्रत वाचून योग्य सूचना केल्या व आपला अभिप्राय पाठवून त्यायोगें मला–अज्ञाला–गौरविलें आहे. ( ४ ) रा. रा. जगन्नाथ रघनाथ आजगांवकर–महाराष्ट्रकविचरित्रकार–यांनींहि कृपाळू-पणें आपला अभिप्राय पाठविला. याबद्दल उपरिनिर्दिष्ट सज्जनांचे मी मनः-पूर्वक अनेक वेळां आभार मानतों.

तसेंच ज्यांनीं हें पुस्तक प्रसिद्ध करण्याचे कामीं अंतःकरणपूर्वक प्रेमानें साहाय्य केलें त्यांचें आभार मानणें हें मनुष्यस्वभावाला धरूनच आहे. सध्यां छापखान्यांकडे कामांची किती खेंच आहे, हें सर्वांस महशूरच आहे. अशा बिकट कालांत कविभूषण बा. भा. जोशी, म्यानेजर यशवंत प्रेस, पुणें–यांनीं माझ्या विनंतीस मान देऊन, इतर कामें तहकूब ठेवून माझें हें पुस्तक उत्तम प्रकारें काळजीपूर्वक छापून दिलें व मित्रकार्य म्हणून थोरपणानें या पुस्तकाचीं प्रुफें तपासण्याचेंहि काम लक्षपूर्वक केलें, याबद्दल

मजवर त्यांचे अनंत उपकार आहेत. त्यांचा उतराई होणें म्हणजे मी त्यांचें उपकार सदैव स्मरणें होय.

एथील उदार धनिक सद्गृहस्थ श्रीमंत रा. रा. भास्कर वामन ऊर्फ भाऊसाहेब देशपांडे यांनीं या पुस्तकास जें आर्थिक साहाय्य केलें, तसेंच येथील माझे धनिक मित्र व्यवहारपटु मोहनलाल किसनदास शिंगवी, यांनीं स्वेच्छेनें प्रस्तुत पुस्तकास जें द्रव्यसाह्य केलें त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहें. द्रव्याभावीं जगांत किती अडचणी येतात हें वेगळें सांगणें नको. तसेंच एथील शाळेचे लोकप्रिय हेडमास्तर व माझे मित्र विद्वन्मणि य. पं. गंभीर, यांचा या पुस्तकप्रकाशनाचे कामीं मला फार उपयोग झाला. कच्ची प्रत समग्र वाचून योग्य सूचना करणें, पुस्तक प्रका-शित करण्याबद्दल प्रोत्साहन देणें हीं कामें मित्र रा. गंभीर यांनीं फार कळ-कळीनें केलीं याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत. त्याच-प्रमाणें पेन्शनर हेड मास्तर गुरुवर्य स. वा. पेठे या सरलहृदय विद्वानांनीं या पुस्तकासंबंधीं एक महत्त्वाची सूचना केली; व माझे मित्र व्यवहार प्रज्ञ ना. वा. खडके, पोष्टमास्तर कडा, हल्लीं पोस्टलक्लार्क पंढरपूर, यांनीं मला 'प्रस्तुत पुस्तक प्रकाशित कराच' असा प्रेमाग्रह अनेक वेळां केला, याबद्दल मीं त्या उभयतांचा अत्यंत आभारी आहें.

शेवटीं त्या जगच्चालक प्रभूचें–श्रीपांडुरंगाचें–मनोभावें स्मरण करून, त्याचे चरणीं शतशः प्रणाम करून हें हृद्गत पुरे करितों.

मु. कडें, पेटा जामखेड, जि० नगर.<br>मकरसंक्रमण, पौष व. ९ श. १८४१. } देवसंतचरणरज,<br>शंकर श्रीधर धनेश्वर.

# अनुक्रमणिका.


| विषय | प्रसिद्धिकाल | प्रसिद्धिसाधन | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ पंढरीमहिमा | ... २४।७।१३ | ... मुमुक्षु | १ |
| २ श्रीराम-प्रार्थना | ... ५।३।१४ | ... ,, | २ |
| ३ रामयाचना | ... ४।३।१५ | ... ,, | ३ |
| ४ विठ्ठलप्रार्थना | ... १।१०।१७ | ... ,, | ४ |
| ५ धांवा | ... ८।७।१५ | ... ,, | ४ |
| ६ हरिशरणाष्टक | ... ९।३।१६ | ... ,, | ६ |
| ७ विठ्ठलप्रार्थना | ... १।१०।१७ | ... ,, | ७ |
| ८ नाथषष्ठींतील भजनानंद | १।४।१५ | ... ,, | ८ |
| ९ मनाची प्रार्थना | ... २४।१२।१४ | ... ,, | १० |
| १० त्रिविध तप | ... ११।१०।१७ | ... ,, | ११ |
| ११ बालशंकरप्रभाव | ... २३।७।१५ | ... आचार्य | १२ |
| १२ साधुवर तुकाराम | ... ११।१।१८ | ... मुमुक्षु | १३ |
| १३ ईशभीति | ... २५।११।१५ | ... ,, | १५ |
| १४ यक्षप्रश्न | ... २१।१।१८; १।२।१८ | ,, | १५ |
| १५ सत्संगति | ... ११।२।१८ | ... ,, | १८ |
| १६ दशावतार | ... १६।६।१४ | ... ,, | १९ |
| १७ सफलायु | ... १४।८।१५ | ... करमणूक | २० |
| १८ उपकुर्वाणक ब्रह्मचारी | २१।१२।१४; | ब्रह्मविद्याग्रंथरत्नमाला | |
| | २२।४।१५ | ... मुमुक्षु | २१ |
| १९ बोधप्रद आर्या | ... ४।३।१५ | ... ,, | २२ |
| २० मनोमन साक्ष | ... आक्टोबर १९१७ | ... शालापत्रक | २३ |
| २१ प्रत्यक्ष प्रमाण | ... फेब्रुवारी १९१८ | ... ,, | २४ |
| २२ योग्य उपदेशक | ... जानेवारी १९१८ | ... लोकमित्र | २५ |
| २३ पुस्तकी ज्ञान | ... जून १९१५ | ... ज्ञानांजन | २७ |
| २४ पारमार्थिक बोध | ... ... | ... (अप्रकाशित) | २८ |
| २५ श्रीब्रह्मानंद स्वामी | ... .... | ... (अप्रकाशित) | २८ |

 मे. का० ८२९

# अभिप्राय.

## ( १ )

कविवर्य शंकर श्रीधर धनेश्वर यांस—सप्रेम सां. नमस्कार वि. वि.—

आपण परमेश्वरगुणानुवादात्मक रचलेल्या कांहीं कविता मुमुक्षूंतून वगैरे प्रसिद्ध झालेल्या पुस्तकरूपानें एकत्र करण्याचा आपला मानस असल्याचें कळवून आपण मला त्या कविता मुद्दाम वाचण्यासाठीं प्रेमपुरःसर पाठवून अमृतप्राशनार्थ आळशावर गंगा लोटलीत, याबद्दल मी आपला फार आभारी आहें. आपण धनेश्वर कुळांत जन्म घेऊन अंतः-करणपूर्वक हरीचे गुणानुवाद गाण्याकरितां यथामति कवीश्वर बनलां, हें आपल्या कुलास भूषण असून नरदेहाचें सार्थक यांतच आहे, हें सांगावयास नकोच. ही स्फूर्ति सुदैवेंकरून एखाद्यालाच होते....

आपल्या कविता वाचून माझ्या मनाला आनंद झाला...कवित्वाची कसोटी समर्थांनीं ( दासबोध, स. १४—३ यांत ) दिली आहे. आपल्या-कविता मीं वाचल्यानंतर त्या मीं समर्थांच्या कसोटीशीं थोडयाबहुत प्रमाणानें यथामति घासून पाहिल्या. त्यावरून आपल्या कविता हिणकस नाहींत असें मात्र मी ठरविलें. धीठ, पाठ व प्रासादिक, असे कवितेचे तीन प्रकार समर्थांनीं सांगितले आहेत. परमेश्वरभक्तीवांचून जें कवित्व तें समर्थांनीं एकजात धीटपाठांत काढलें आहे. अर्थात् "मेघाकडे पाहून" "फुलपाखरूं" "मधमाशी" "केरसुणी" इत्यादि "दृष्टी पडलें तेंचि वर्णिलें" अशा प्रकारें सृष्टिसौंदर्यादिक नाशवंत वस्तूवर मुलामा चढविण्याच्या काव्याची स्फूर्ति झालेले 'सुत' आणि 'तनय' 'अग्रज' आणि 'आत्मज' 'नाथ' आणि 'धव' अशा नामधारी शब्दिकवींचा आजकाल नाटकें, कादंबऱ्या, मासिकें, इत्यादिकांतून सुळसुळाट झाला असून कित्येकांचे निष्णात म्हणून कीर्तिध्वजही फडकत आहेत! पण समर्थांच्या व्याख्येप्रमाणें हे सर्व कवि 'धीटपाठ्ये' या सदरांत जातात! आजकाल-

च्या उथळ विचाराच्या लोकांचें आधिभौतिकदृष्ट्या अभिरुचीनुरूप मनरंजन करण्याला किंवा प्रोत्साहन देण्याला हीं काव्यें परिस्थित्यनुरूप उपयुक्त आहेत असें मानलें, तरी आध्यात्मिकदृष्ट्या समर्थांच्या व्याख्येप्रमाणें तीं "भक्तिहीन जें कवित्व। तें जाणावें ठोंबें मत" ( १४·३·१९ ) या सदरांत पडत असल्यामुळें निरुपयोगी अतएव एकदां वाचून टाकण्यापैकींच हीं काव्यें नव्हेत काय ?

"भक्तिज्ञानवैराग्ययुक्त कवित्व असावें" ( दा. १४·३ १८ ) अशी समर्थांची सांगी आहे. त्या सदरांत आपल्या कविता येत असल्यामुळें त्या "प्रासादिक" या समर्थांच्या कवित्वाच्या तिसऱ्या प्रकारांत बिनादिक्कत येतात. स्फूर्तिवांचून तर कोणतेंच कवित्व नाहीं. पण 'अहं' स्फूर्तीतून निघालेल्या कवितेची भाषा अलंकारांनीं नटलेली, विद्वत्तापूर्ण अतएव केवळ विद्वानांना रंजविणारी रजोगुणी असते. आणि "आवडी लागली अंतरीं। तैशाचि वदे वैखरी" ( १४ ३·२७ ) अशा 'स्वयं' स्फूर्तीतून निघालेली भाषा, ही एखाद्या साध्या साध्वीसारखी साधी, सुलभ व सहज अशी असते. आपल्या कवितेची भाषा अशीच आहे, हें कोणीही कबूल करील. अशा प्रकारची स्वयंप्रेरित भाषा हृदयाच्या प्रसन्नतेवांचून बाहेर सहज येत नाहीं. हृदयाची प्रसन्नता हाच ईश्वराचा प्रसाद होय. भाषेच्या साधेपणांत साधुत्व, सुलभत्वांत बहुलाभ आणि सहजांत जी मौज असते, ती नट्टापट्टा केलेल्या अलंकारिक भाषेंत नसते, असें माझ्या अल्पमतीला वाटतें......—कळावें कृपा असावी हे विनंती.

आपला,

मित्ती कार्तिक शुद्ध १, दीपावलि, शके १८४१. } गोविंदसुत ऊर्फ परशुराम गोविंद चिंचाळकर.

 सं. कार्ल २९

( २ )

रा. रा. शंकर श्रीधर घनेश्वर यांच्या प्रस्तुत काव्यकलापांतील सर्व कविता मीं वाचल्या व त्यांपैकीं बऱ्याच मला आवडल्या. या कलापांत संकलित केलेल्या कवितांपैकीं मनोमय मोक्ष वगैरे दोनचार प्रकरणांशिवाय बाकीच्या कविता ईशचिंतनपर व उपदेशात्मक आहेत. विशेषेंकरून नाथषष्ठीचा भजनानंद, पंढरीमहिमा, बालशंकरप्रभाव वगैरे प्रकरणें सरस उतरलीं आहेत. उपदेशपर प्रकरणें तर सर्वच चांगलीं आहेत. रा. रा. घनेश्वर यांची कविता मुमुक्षु, करमणूक, या वृत्तपत्रांचे व ज्ञानांजन, ब्रह्मविद्या-ग्रंथरत्नमाला, आचार्य इ० नियतकालिकांचे द्वारें महाराष्ट्रास परिचित असल्यामुळें तिजबद्दल जास्त लिहिण्याचें वस्तुतः प्रयोजन नाहीं. प्रत्येक आधुनिक सुशिक्षिताला छंदोबद्ध रचना करतां आली पाहिजे असें माझें मत आहे. रा. रा. घनेश्वर यांचा असाच व्यासंग सारखा चालू राहिल्यास ते कालांतरानें चांगले यशस्वी कवि होतील असें आज म्हणावयास कांहीं हरकत नाहीं. ज्यानें मनुष्यमात्रास वाणी व बुद्धि या दोन अमूल्य देणग्या देऊन आपलें अक्षय्य ऋणी करून ठेविलें आहे, त्या जगन्नायकाच्या नामसंकीर्तन व गुणगुवर्णनपर चिंतनांत त्यांचा यथारुचि व यथाशक्ति व्यय करणें हें सर्वथैव उचित आहे. व या न्यायानें रा. घनेश्वर यांनीं आपल्या वाणीचा व बुद्धिमत्तेचा योग्य तोच उपयोग केला असें म्हटलें पाहिजे. तथापि यःकश्चित गवताच्या पातीपासून तों तहत् जीवसृष्टीच्या राजपदावर आरूढ झालेल्या मानवी प्राण्यापर्यंतचें सर्व वस्तुजात ईश्वरी चैतन्यानें व्यापिलेलें आहे व म्हणून कोणत्याही विषयावर केलेलें कवित्व पर्यायानें ईशभजनपरच होऊं शकतें हें लक्षांत ठेविलें पाहिजे. साकार-मूर्तींचें भजन तेवढेंच ईशचिंतन असें मात्र नव्हे. आपण ईश्वरी इच्छेनें ज्या राष्ट्रांत जन्मास आलों आहोंत त्या राष्ट्रांतील बहुजनसमाजास सांप्रत कोणत्या प्रकारच्या काव्याची अवश्यकता आहे याचें निदान करून व तें

लक्षांत आणून श्रीसमर्थांनीं चोखाळून ठेविलेल्या मार्गानें रा. घनेश्वर यांनीं पदारोपण केल्यास ते विशेष यशस्वी होतील हें सागणें नकोच.

पुणें, पौष शु. १२ । १८४१. ] अनंततनय.

( ३ )

रा. रा. शंकर श्रीधर घनेश्वर यांनीं मुमुक्षु, आचार्य, लोकमित्र, ज्ञानांजन, वगैरेंमधून पूर्वीं प्रसिद्ध केलेल्या स्फुट कविता हल्लीं एकत्र करून पुस्तकरूपानें प्रसिद्ध केल्या आहेत त्या समग्र वाचल्या. कवीचे विचारांची प्रवृत्ति पारमार्थिक दिशेकडे विशेष रीतीनें वळलेली असून कविता भक्तिरसप्रधान आहेत. यामुळें मुमुक्षूंना त्या अवश्य वाचनीय अशा झालेल्या आहेत. कवितेचीं बहुतेक प्रकरणें अगदीं संक्षिप्त व बोधप्रद अशीं आहेत. " मनोमनसाक्ष," " पुस्तकी ज्ञान " वगैरे कांहीं प्रकरणें मार्मिक व सरस आहेत. भाषा साधी, सोपी व सरळ आहे. एकंदरींत पुस्तक संग्राह्य आहे.

अमळनेर } द. प. चिंचाळकर, बी. ए. एल् एल्. बी.
ता. २०।१०।१९ } वकील, अमळनेर, जि० पूर्वखानदेश.

( ४ )

रा. रा. शंकर श्रीधर घनेश्वर यांची कांहीं कविता मीं पाहिली आहे. त्यांची रचना सुलभ असून, भाषा साधी व मधुर आहे. कविता संस्कृत कवितेच्या धाटणीवर रचलेली दिसते. वृत्तदोष किंवा व्याकरणदोष फारसे कोठें आढळले नाहींत. अभ्यासानें याहून चांगली कविता करण्यास ते खात्रीनें समर्थ होतील असें मला वाटतें. खेडेगांवांत राहून शिक्षकाचा धंदा करणाऱ्या रा. घनेश्वरांची प्रवृत्ति लेखन व काव्यरचना यांजकडे व्हावी हें त्यांस अत्यंत भूषणावह व इतर शिक्षकांस अनुकरणीय आहे.

मुंबई } ज. र. आजगांवकर,
२७।१।२० } महाराष्ट्रकविचरित्रकर्ता.

# भक्ति-सुधा.

ग्रंथ संग्रहालय ... क्र. 1620 ... (स्थळ प्रत)

## १ पंढरीमहिमा.

चाल-( केशवकरणी अघटित लीला. )

वंदनीय जीं क्षेत्रें सांप्रत त्यांत मुख्य पंढरी
प्रथित[1] जो सत्य विठूची पुरी ।
भक्तकामकल्पद्रुम विठ्ठल पुंडरीकवरद तो
सदा त्या पंढरींत नांदतो ।
भक्तजनांची वाट बघतसे कर ठेवुनियां कटीं
विटेवरि मूर्ति उभी गोमटी ।
दिव्य रुचिर तें तेज विलसतें मुखपद्मीं सुंदर
रुंजती भक्तभृंग अतितर[2] ।
पांडुरंगदर्शना सदोदित भक्त येति धांवुनी
संकटें त्रास विपुल सोसुनी ।
रम्य सुगंधित कुसुममालिका तुलसिमंजिरीयुता
अर्पिती मनीं धरुनि नम्रता ।
परंपरावंदित[3] ही मूर्ती नेत्रें आलोकिती
प्रेमें कान धरुनि नाचती ।
अंतःकरणीं विठ्ठलमूर्ती ठसवुनि मन अर्पुनी
भक्त ते परततात तेथुनी ।
भवरोगानें त्रस्त नराला दिव्यौषधि पंढरी
सुजन हो! सत्य विठूची पुरी ॥ १ ॥

---

१ प्रसिद्ध. २ फार. ३ ज्ञानेश्वरनामदेवादि संतांनीं वंदन केलेली.

## २ श्रीरामप्रार्थना.

चाल–( उद्धवा, शांतवन कर जा० )

श्रीरामा ! मंगलधामा ! तूं सागर बा करुणेचा ॥ ध्रु० ॥
तव चरणां विनयें नमितों, अतितर मी शुद्ध मनानें;
मी हीन दीन बहु झालों, दुःसह या भवपाशानें;
अति दुःख भोगितों सदया ! सन्मार्ग दावि प्रेमानें;
षड्विकार मज बहु छळिती,
मम मना मिळेना शांती,
तें लुब्ध सदा स्त्रीवरती,
धरि लोभ बहुत कनकाचा ॥ तूं सागर ॥ १ ॥
अध्यात्मविषय त्या न रुचे, तेसेंच तुझें बा स्मरण;
स्त्रीधनसुतगणगोतानें केलें रे याचें हरण;
तव नामभजन नच करितां, मज येइल गमतें मरण !
जे नाम न घेतां मरती,
त्यां कष्टतरा होय गती,
यमदूत दुःख बहु देती,
बोलती संत हे वाचा ॥ तूं सागर ॥ २ ॥
एकाग्र शुद्ध प्रेमानें, तव रूप मनोहर ध्यावें,
तव तारक नाम सदा तें भक्तीनें वदना यावें,
हृदयीं जे विकल्प उठती, ते सकलाचि नष्ट करावे,
म्हणुनि मी शरण तुज आलों,
तव चरणीं विनम्र झालों,
भवसागरिं बुडलों! बुडलों!
दे आश्रय तव चरणाचा ॥ तूं सागर ॥ ३ ॥

---

१ संसाररूपी फास.

## ३ रामयाचना.

श्लोक (वसंततिलका वृत्त.)

रामा! तुझें विमलपादसरोज वंदीं,
  जें कीं भवार्ति चुकवी, जिरवूनि धुंदी;
त्वन्नाम पुण्यसुखकारक मन्मुखांत
  राहो सदा, विषयजाल नको मनांत. १
मी तों अपात्र मतिमंद कुमार्गगामी,
  दुर्वासनावश, पराङ्मुख सत्यकामीं;
संस्कार दुष्ट असुकृत् प्रबळ अपार
  अंतःस्थ मद्वसत हे रघुवंशसार! २
मी नेम नित्य करितों न करीन गर्व,
  स्वाध्यायकर्म सविधी उरकीन सर्व;
गीता त्रिभाग[2] तरि विष्णुसहस्रनाम
  वाचीन रोज नियमें, न धरोनि काम; ३
एकादशीस प्रति मी म्हणतों करीन
  रुद्राभिषेक बहु शुद्ध मनेंकरून
विष्णू, महेश, गणराज, रवी, भवानी
  देवांस या; नियम हा न घडे जपूनी. ४
कित्येक अन्हिं[3] वरचीं अवघींहि कर्में
  होतात सांग बहु मोदभरें स्वधर्में,
एकेक मंदगतिनें न घडोन नेम
  पूर्वस्थितीवर बसे, नुरकेच काम. ५
एतावता नियम मी करितों अपार
  उद्विग्नता विषय त्यां करितात वार!
निष्कांचन स्थितिमुळें बहु दुःखदायी
  संसारपाश मज होय; सुचे न कांहीं. ६

---

१ संसारदुःख. २ भगवद्गीतेचे सहा अध्याय. ३ दिवस. ४ याप्रमाणें.

दुर्वासना विषय घातक घोर दुष्ट,
यांचीं फळें कटु विषासम, तीं न इष्ट;
हीं सेवितां अतुल अत्रपरत्र[1] दुःख
होतें, मिळे न लवमात्र कदापि सौख्य. ७
हें कीं मला समजतें, मग कां मनांत
हे घोर घातक विकार सदाहि येत?
हें कांहिं ना उमनतें करितां विचार,
वाटे तदा अमित[2] दुःख; दिसे असार. ८
आंदोलनस्थिति[3] अशी बहु मन्मनाची
होते, उपाय न कळे, कथि हेंच याची!
अत्यंत दीन शरणागत मी अनन्य
रामा! करीं धरिं मला, मम वारिं दैन्य. ९

---

## ४ विठ्ठलप्रार्थना.

( चाल–माझी देवपुजा० )

।विठ्ठल नाम वदा, नाम वदा । चुकेल मग भवविपदा! ॥ध्रु०॥
वैभव धन सुत दारा । मृगजलरूपी सर्व पसारा ॥ १ ॥
चौऱ्यांशीचा फेरा । फिरशी माया-मोहें सुनरा! ॥ २ ॥
दुर्लभ नरजन्माला । अगणित पुण्यें बा तूं आला ॥ ३ ॥
सार्थक कर जन्माचें । घेउनि नाम सतत तूं वाचे ॥ ४ ॥
प्रेमें विठ्ठल वदतो । संतत मोक्षपदा तो वरितो ॥ ५ ॥

---

## ५ धांवा.

( चाल– अजि अक्रुर हा० )

हे धांव विभो! करुणाकर कंसारी
भवसंकट पडलें भारी ॥ ध्रु० ॥

---

१ या लोकीं व परलोकीं. २ अतिशय. ३ झोक्याप्रमाणें. ४ मागतो.

भवजलडोहीं नक्र दोन बहु मोठे
स्त्री-हेम ओढिती नेटें !
या डोहाचा अंतपार मज कांहीं
अज्ञासी उमजत नाहीं.
ह्या मोहमयी कृत्या आशा-तृष्णा
भुलविती अधिक मज अज्ञा;
चाल ॥ कित्येक ज्ञानवंतांला
गणना नच अज्ञजनांला
बुडविलें; अभय दे मजला,
करिं धरिं सदया ! दीन-भक्त-कैवारी !
तव विना कोण मज तारी ? १

हे गोपाला ! गोविंदा वनमाले ,
मुरलीधर पांडवपाली !
हे नंदसुता, नंदक[1] सकलां, ईशा,
झणिं धांव धांव परमेशा !
तारिले तुवां आजवरी बहु दीन
अत्यंत पातकी हीन.
हें नवल नसे ! तारिलेंस मज नवल !
तव नाम सार्थ होईल !
चाल ॥ अत्यंत श्रेष्ठतम पापी,
मी अंतर्बाह्य असें कीं,
उपमा मज न मिळे लोकीं[2] !
देखिलास कां मजसम पातकधारी ?
मी शरण विभो ! मज तारीं. २

---

१ आनंददायक. २ जगांत.

## ६ हरिशरणाष्टक.

श्लोक ( वसंततिलका वृत्त. )

श्रीपांडुरंग, हरि विठ्ठल हे मुरारी !
गोविंद, वामन हरे मदनांतकारी !
वैकुंठनायक, उमाधव कंसहंता !
आलों तुला शरण, सोडुनियां अहंता. १
गोपाळ, भास्कर रमावर एकनाथ !
श्रीरामचंद्र, रघुनायक रंगनाथ !
सीतापते, रघुवरा इनवंशसारा !
बा ! यास दे तवपदीं हरि ! नित्य थारा. २
श्रीपाददत्त, धरणीधर चक्रपाणि !
प्रद्युम्न, भार्गव सदाशिव शूलपाणि !
शंभो ! उमारमण पांडवसाह्यकारी !
आलों तुला शरण, पातक मन्निवारीं. ३
श्रीवासुदेव मुरलीधर गोकुलेश !
श्रीव्यंकटेश, पुरुषोत्तम हे महेश !
मार्तंड भैरव सुरेश्वर विश्वनाथ !
माझ्याकडे बघ सख्या ! बहु मी अनाथ ! ४
नारायणा, नरहरी करुणावतारा !
गंगाधरा, हरिहरा गिरिजाकुमारा !
श्रीइंदिरेश मधुसूदन सर्वसाक्षी !
मी पातकी, मज कृपा करुनीच लक्षीं. ५
देवा ! जगज्जनक, मोहनिराज ईश !
क्षीराब्धिवासि परमेश्वर काल शेष !
हे श्रीधरा, यदुकुलोत्तम हे सुरेंद्रा !
मातें विलोक करुणाकर, घे न निद्रा. ६

---

१ दयेची खाण.

कृष्णा ! पुराणपुरुषा सुकुमारगात्रा !
ब्रह्मांडनायक गदाधर पद्मनेत्रा !
विश्वेश्वरा, कमलनाभ, अनंत राम !
दे त्वत्पदींच मजला वसण्यास धाम. ७
हे देवकीसुत विभो ! जगदाभिराम !
सिद्धेश्वरा, मुनिवरा जयपुण्यधाम !
हे पुंडरीकवरदा ! भगवन् दयाळा !
मातें कृपा करुनि पावचि एक वेळां ! ८

---

## ७ विठ्ठलप्रार्थना.

चाल-( कोणिकडे जातां जाता जिवलगा० )

रुक्मिणीवरा, वरा भक्तपाला, ॥ ध्रु० ॥
शरण मी तुझ्या चरणकमला ॥
येऊं दे दया, दया अंतरांत ।
बुडें मी भवार्णवीं पतित ॥
दिसे नच मला, मला पुण्यपंथ ।
तसें ना कळे कोण संत ॥
येतसे मनीं, मनीं अमित पाप ।
हृदयिं खेळतो विषयसर्प ॥
नेत्रही तसे, तसे दुष्ट भारी ।
उठविती मनीं मदनलहरी ! ॥
आवरी मना, मना खचित मजला
नावरे काय करूं याला ! ॥ १ ॥
कमललोचना ! लोचना श्रीनिवासा ।
विठ्ठला प्रभो ! परमपुरुषा ॥
विश्वरक्षका, रक्षका देवदेवा ।
नगोद्धारका, महादेवा ॥

पतितपावना, पावना रामराया ।
विनति ना अन्य तुला सदया ॥
हेंच मागतों, मागतों पांडुरंगा ।
न जावें मनें दुष्टसंगा ॥
छंद नामाचा, नामाचा दे त्याला ॥
सतत भो विभो ! नमन तुजला ॥ २ ॥

---

## ८ नाथषष्ठींतील भजनानंद.

( चाल–अंबरगत पारि पयोधरांतं० )

प्रतिष्ठान श्रीक्षेत्रनिवासी 'नाथ' तुझे चरणीं
नमन मम विनयभाव धरुनी ॥ ध्रु० ॥
तव सदनीं सुरवंद्य राबतो स्वयें चक्रपाणी
भरी तो आवडिनें पाणी !
अगम्य दुर्लभ नाथ-षष्ठिसुख ज्यांनीं उपभोगिलें
स्वतां नर धन्य जगीं ते भले !
चाल ॥ जी गंगामाई ताप-पापमोचनी
श्रीविष्णुपादजा, भवसागरिं नंदिनी,
संस्मरणें केवळ मोक्षसौख्यदायिनी,
सद्भावें ती वंदन करिती सुभक्त येतांक्षणीं
हर्षती प्रेमानंदें मनीं.
मोदभरें मग मज्जन करिती पूतजलीं ते सुखें
'गंगे ! हर हर !' म्हणती मुखें.
पूत जलस्थल, पूत विचारचि, पूत भाव मानसीं,
नुरे मग अपूतता अल्पशी.
चाल ॥ ग्रामांत नाथदर्शना त्वरें धावती,
शुद्धांतःकरणें जगन्नाथ पाहती,

---

१ आनंद देणारी.

नाथानें हस्तें स्थापियली मूर्ति ती
"नाथमहाराजकी जय" मुदें करुनि सगद्गद ध्वनि
हर्षयुत मनें निघति तेथुनी. २
नाथसमाधी, जिला नाम कीं 'बाहेरिल नाथ' हें,
अंतर्बाह्य वसत जो स्वयें;
स्वेच्छेनें नाथानें केली निजतनु गंगार्पण—
तेथें स्वानंदीं येउन.
चाल ॥ अतिविनम्रभावें परम शुद्ध मानसें,
सानंदें प्रेमें नमिति विलोकिति तसे,
हे नाथ! चरित तव अनुपम भारी असे,
सबाह्यांतरीं प्रेम दाटतें नाथ-दर्शनें झणीं,
जातसे देहभाव हरपुनी! ३
निघे पालखी दिंडा जेव्हां दिसे रम्य थाट तो
भक्तगण भजनांबुधिं पोहतो;
"भानुदास एकनाथ" वदनें "रामकृष्ण हरि" वदे
भक्त नाचती डोलती मुदें;
चाल ॥ तो नामघोष तो टाळ-मृदंगध्वनी,
ती एकतानता भक्तांची देखुनी,
सद्भक्त नाचतो प्रेममग्न होउनी,
द्रवेल मन, जो नास्तिक त्याचें, प्रसंग हा पाहुनी!
वृत्ति रंगते ब्रह्मचिंतनीं! ४
जन्मा येउनि एकवेळ तरि नाथरायदर्शना
सुजन हो! जावें ही प्रार्थना.
अपूर्व सुख, ती अपूर्व शोभा, नामघोषलीला
अल्पही न वर्णवे मजला.
चाल ॥ मी अनाथ नाथा! सनाथ मजला करीं,

१ भजनसागरांत. २ एकाग्रता.

भवपाशबद्ध भोगितों दुःख, धरिं करीं.
मी अनन्यभावें शरण तुला अंतरीं,
लव न घडे तव भजन समर्था, राग नको धरूं मनीं.
दयाळा! ने मज संभाळुनी. ५

---

## ९. मनाची प्रार्थना.

( आर्या )

श्री राम*-वास आहे सर्व ठिकाणीं, मना न करिं पाप;
रा जीवलोचना त्या स्मरल्यानें दूर होति संताप. १
म नुजाचें जीवित हें नश्वर बहु लोलें[1] वारिबुद्बुदसें[2],
ज डता स्मरणीं धरिशी सुमना! तुज लागलेंच काय पिसें २
य मदूत दुःख देती, नितरां[3] मनुताप[4] होय व्यर्थ मना.
रा नीं आक्रंदन वा शवाननीं[5] उच्च औषधी नाना. ३
म दकारी विषयांच्या मोहक जालीं नको मना गुंतुं,
ज रि अल्प गुंतलासी, त्यांतचि झाला तुझा समज अंतु. ४
य त्नें दग्ध करावा दुःखद तो कुवासनानिचय[6],
ज यशील मना! येइल मोक्ष तुझे वंदण्यास तो पाय. ५
य जनें[7] करीं प्रेमानें, स्मरण तसें ध्यान पूर्ण भक्तीनें,
रा मपदीं नत होईं, भृंग जसा पंकजीं सदेह-मनें. ६
म नराज! सर्व सूत्रें चालविसी देहरूप-नौकेचीं,
श्रीरामचंद्रचरणस्तट दावीं, भीति ना उरे साची. ७

---

* पहिल्या तेरा चरणांचीं प्रथमाक्षरें जुळवून वाचल्यास प्रेमळ राम-भक्तांस बरेंच समाधान वाटेल, अशी आशा आहे.

१ चंचल. २ पाण्याच्या बुडबुड्याप्रमाणें. ३ अतिशय. ४ पश्चात्ताप. ५ प्रेतमुखांत. ६ दुष्ट वासनांचा समूह. ७ पूजन.

## १०. त्रिविध तप.

चाल--( वसिष्ठ मुनिवर म्हणे नृपाळा॰ )

मुमुक्षूस पाहिजे अवश्यक तपाचरण योग्य तें
जयानें इष्ट कार्य साधतें ॥ ध्रु ०॥
वर्तन नियमितपणें ठेवणें, हेंच सुलभ तप असे,
दुर्गम साधण्यास हें नसे.
कायिक, वाचिक तसें मानसिक, त्रिविध भेद हे पहा,
लक्षणें अशीं मनीं वागवाः—
देवद्विजगुरुपूजन करणें, निर्मल असणें सदा,
करावें चौर्यकर्म ना कदा.
ब्रह्मचर्य पाळणें, अहिंसक वृत्ति, भले बोलती
घडे तप "कायिक" येणें रिती,
अनुद्वेग सत्य प्रिय हितकर वच, स्वाध्यायीं [1]रत
नाम या "वाङ्मय" तप संतत.
सदैव संतोषांत राहणें, शांत वृत्ति ठेवणें,
मौन तें आनंदें सेवणें.
मन संकल्पाविरहित असणें, मौन हेंच मानें धरा,
निग्रहो आत्मचिंतनीं बरा.
भाव शुद्ध ठेवुनी जगांतिल चमत्कृती पाहणें,
"मानसिक" तप हें ज्ञाता म्हणे.
चालः--जो आचरतो हीं त्रिविध तपें त्याजला,
लाभते मोक्षगति सुखें सहज निश्चला,
[2]इहंपरत्र होतो धन्य मनुज तो भला.,
कष्टसाध्य परि चिरसुखदायी तपें आचरा नतें
श्रुति हें कंठरवें सांगते!

———

१ रममाण. २ या लोकीं व परलोकीं.

## ११ बालशंकराचार्यप्रभाव.

( आर्या. )

प्रथमाब्दींच तयाला देशी भाषा सुरेख ती आली;
द्वितियाब्दिं लेखनकला, सर्व पुराणें तयें श्रवण केलीं. १
जनक तयाचा गेला तिसऱ्या वर्षीं अहा! शिवपुरास[1];
शंभूनें दिधला त्या सर्वज्ञपणा चतुर्थ वर्षास. २
गुरुनीं शिवगुरुतनुचें[2] केलें उपनयन पांचव्या वर्षीं,
वेदाध्ययन तयांनीं सांगितलें तेधवां मुदें त्यार्शी. ३
दैवी शक्तीनें त्या संपन्न सुतास वेद-वेदांग
अर्थासहित स्फुरलीं! आपोआपचि गुरूंसि तो सांगे. ४
अधिकारी हा आहे शिष्य मला लाभला म्हणूनि मनीं
स्वयमेव धन्य झालों, निःसंशय हें असें गुरू मानी. ५
भिक्षार्थ एकदां हा, शंकरबटु गुरुगृहीं असे जेव्हां
निष्कांचन. द्विजालयीं गेला, आश्चर्य जाहलें तेव्हां. ६
बटु " ॐ भवती भिक्षां ददातु " ऐसें ह्मणे. श्रवण केलें
द्विजभार्येनें, तेव्हां विषण्णहृदयें[3] बटूस हें म्हटलें- ७
असतलि सुखी भूवरिं भिक्षा तुजसम बटूस देणारे,
हतभाग्य पूर्ण आह्मी; नाहीं तें सुख अम्हांस बाबा रे! ८
दैवीं नाहीं अमुच्या तुज द्याया अन्न घासभर एक.
वदली; घरांतला मग घाली भिक्षेस एक आमलक[4]! ९
हृदयद्रावक भाषण द्विजभार्येचें असें श्रवण करुनी,
झाला दयार्द्र तेव्हां आमलकें तुष्ट तो बटु स्वमनीं. १०
मग बटु लक्ष्मीस ह्मणे " देवि अये! या द्विजालयीं नित्य
वास करीं तूं " चित्तीं आहे मम हेतु हा असा सत्य. ११
देवी लक्ष्मी झाली तुष्ट तदा शंकरापुढें प्रकट,
'वत्सा! वर माग' असें वदली 'जो पाहिजे तुला इष्ट' १२

---

१ कैलासाला. २ आचार्यांचें. ३ खिन्न अंतःकरणानें. ४ आवळा.

शंकर वदला तेव्हां 'देवि! मला तूं प्रसन्न असशील,
तरि हेमामलकांनीं[1] द्विजगृह हें सर्व पूर्ण भरशील.' १३
लक्ष्मी वदली "वत्सा! सुकृत नसे पूर्वजन्मिं केलेलें
कोणींच या कुटुंबीं, म्हणुनी दुर्दैन्य प्राप्त त्यां झालें. १४
तुजलाहि विदित आहे वृत्त असें." शंकरें परी[2] धरिला
आग्रह, म्हणुनी नेला लक्ष्मीनें हेतु तत् सफलतेला. १५
या अद्भुत वृत्तान्तें श्रीशंकरकीर्ति विस्तृता झाली;
त्या प्रांतांत सकल जन वदले ही गोष्ट अद्भुता घडली! १६
हा वेदमर्म-उद्घाटनकारकशास्त्रसंगतीकर हा
तद्वाक्य ऐक्यकारक षड्वर्षांतचि प्रसिद्ध होय महा! १७
आचार्यान्तर्गत[3] हें आचार्यचरित्र मी विलोकून
आचार्यपादकमलीं आर्या अर्पीं तयांस वंदून. १८

---

## १२ साधुवर तुकाराम.

(आर्या.)

श्रीविठ्ठलभक्ताग्रणि साधूत्तम सत्य हो तुकाराम,
तुल्य न यासम दुसरा निस्पृह धार्मिक सुभक्त निष्काम. १
कादंबिनीस[4] बघतां हर्षें नाचे मयूर अत्यंत,
राजीवनेत्र विठ्ठल तव भजनें तुष्ट जाहला अमित. २
मनुजकुलीं येउनि बा कायेसह जीवितास उद्धरिलें,
केवल ईशकृपेनें सदेह वैकुंठगमन तूं केलें! ३
जन्म सफल त्यांचा, जे रामस्मरणीं अकामता नित्य,
परमार्थीं रत, सुविनत, चित्तीं शब्दीं क्रियेंत जे सत्य. ४
कविगुरु! दशोपनिषदें गीता वेदांत वेदस्वारस्य

---

१ सोन्याच्या आवळ्यांनीं. २ परंतु. ३ आचार्य पाक्षिक पत्रांतील. ४ मेघपंक्ति.

रथ्यांसम[1] तूं केलें, अभंगवाणींत धन्य तव आस्य[2] ! ५
विठ्ठलभजनावांचुनि रुचलें सुचलें दुजें न लेश तुला;
सुखदुःखाचा नाहीं आनंदहि खेद वा तुवां केला. ६
मानव-मनास गोवुनि परमार्थाला विदूर[3] करणार
रम्या[4] रामा, तैसें हेम, जगीं दुष्ट दोन हे असुर. ७
वैराग्य-खड्ग घेउनि तुवां झणीं छेदिले उभय असुर,
परमार्थपथ सुखावह येणें झाला तुम्हांस निर्घोर. ८
अत्यंत थोर आपण, अज्ञजनां इष्ट बोध बहु केला;
वैराग्यविक्रमानें आनंदें खास जनक डोलविला. ९
भक्तीचा जिव्हाळा, वैराग्याचा उभा जणूं पुतळा,
उत्तम बोध जगाला अभंगरूपी मुशींत सांठविला. १०
"मेणाहुनि मउ आम्ही विष्णूचे दास, भेदुं वज्रास;"
भक्तिबळानें होता तुम्हांस हा थोर आत्मविश्वास. ११
दर्पणवत्[5] तव ऐसें साधुसुवर्णित चरित्र जगताला;
रमणीय पूर्ण बोधक भवसागर पैलपार जाण्याला. १२
हा ! मम जीवित निष्फळ होइल वाटे मनांत भय मोठें !
रामस्मरण घडेना, भवपाशविमुक्त करित जें नेटें. १३
जाग्निजवन[6] वेगानें छेदित छद्मास साधुवर बाप,
शंकुल[7] षड्रिपु वारुनि मदीय निःशेष दग्ध करिं पाप. १४
येवो मरण सुखानें अयातनायुक्त अंतकालाला,
श्रीरामनाम यावें वदनीं, मम हीच प्रार्थना तुजला. १५

---

१ राजमार्गाप्रमाणें. २ मुख. ज्या मुखांतून उत्कृष्ट उपयुक्त ज्ञानरूपी अभंग बाहेर पडले तें धन्य होय. ३ अत्यंत लांब. ४ सुंदर. ५ आरशाप्रमाणें. ६ तीक्ष्ण शस्त्र. ७ भयंकर.

## १३ ईशभीति.

श्लोक–( स्वागता वृत्त )

दुर्विकार उठतां हृदयांत, ईश भीति धरि जो न मनांत,
ये घडोनि सहजींच, अनर्थ पापसंचय घडेचि यथार्थ. १
हे अनर्थकर घातक घोर, लौकिकांत बहु दुष्ट विकार;
कीर्तिनाश करिती, समयास प्राणनाशहि कधीं अति त्रास. २
बोलतों सहज आपण नित्य, सत्य अल्प, बहुतांशि असत्य;
लागता संवय ही अति दुष्ट, ये कधीं तरि प्रसंग अनिष्ट. ३
ईशवास सकल स्थल व्यापी, त्यास सर्व दिसतें कळतें कीं!
तो नियामक चराचरशास्ता, भक्तपाल भय-संकट-हर्ता. ४
न्यायनिष्ठुर असे जगदीश, लंघितां नियम, त्या मनुजास-
योग्य शासन मिळे, अणुमात्र तो दया न करि अत्रपरत्र.[1] ५
तो असे परमदीन दयाळ; निंद्य वर्तन जयास विटाळ
श्रेष्ठ भक्त असला[2] प्रतिपाळीं; आवडीं सतत संकटकाळीं. ६
ईशभीति धरितां स्वमनांत, होतसे सफळ तो परमार्थ.
पुण्य-सौख्य मिळतें, भवमुक्त होउनी मनुज होय कृतार्थ. ७

---

## १४ यक्षप्रश्न.

( आर्या )

[ यक्षानें विचारलेल्या प्रश्नांचीं युधिष्ठिरानें जीं उत्तरें दिलीं तीं खालील आर्यांत " " ह्या चिन्हांत दाखविलीं आहेत.]

वद कोणता सनातन धर्म असे ? " मोक्षधर्म तो सत्य."
कीर्ति कशानें मिळते ? " सत्पात्रीं दान केलिया नित्य." १
स्वर्गसुखप्राप्तीचें साधन वद कोणतें ? नृपश्रेष्ठ !
" सच्छील सत्यभाषण साधन आहे नरास उत्कृष्ट." २

---

१. इह किंवा पर लोकीं. २. असा.

धन कोणतें सदुत्तम? "विद्याधन." कोणता परमलाभ ?
"आरोग्य." कोणतें सुख उत्तम? "संतोष मानसांत शुभ." ३
मज कोणता असे तो श्रेष्ठ खरा धर्म सांग नृपराया !
"सदया ! श्रवण करावें. सर्वा भूतीं समान योग्य दया." ४
होण्या न अल्प दुःखहि, काय करावें ? "सुनिग्रह मनाचा."
सर्वप्रिय होण्याला उपाय ? "अभिमान सोडणें साचा." ५
होतो सुखी कशानें ? "त्यजिल्यानें लोभ." साधु तो कवण?
जो झटतो सर्वांच्या हितार्थ रजनीदिवा[1] मनांतून. ६
तप, दम, लज्जा, ज्ञान, क्षमा, दया, शम, तसाच सरळपणा
सांग कशास म्हणावें? बुधप्रवर धर्मराज श्रेष्ठमना ! ७
"निजधर्मी वर्तन जें तेंच तप प्रथित; निग्रह मनाचा-
दम हाच; हीच लज्जा करणें ना निंद्यकर्म कर वाचा." ८
"कीं ज्ञान हेंच, जें कां सत्याचें ज्ञान; ती क्षमा हीच-
सुखदुःख सहन करणें स्तब्धपणें सर्वकाल अवघेंच." ९
"सुस्थिर करणें मन, शम हाच; दया हीच इच्छिणें सुख कीं
सर्वांचें; सरळपणा हाच समानत्व ठेवणें लोकीं." १०
आळस, शोक, शहाणा, मूर्ख, अहंकार, दंभ कीं स्थैर्य,
पैशुन्य, मान, दान, स्नान तसा मोह, दैव कीं धैर्य ११
तद्वत् वद तूं धर्मा ! कामहि, मत्सर कशास म्हणतात ?
सच्चरित निष्कलंका असशी तूं सत्य धन्य जगतांत १२
प्रश्नांचीं षोडश ह्या अनुक्रमें उत्तरें तुम्हां कथितों,
हे यक्षराज ! द्यावें अवधान[2] तुम्हीं सुखें, मुदें नमितों. १३
"धर्माचरण न करणें आळस हा; शोक हाच अज्ञान;
धर्मज्ञ तो शहाणा; मूर्खचि तो जाणतो रमेशा न." १४
"हाच अहंकार असे मोठें अज्ञान; दंभ म्हणतात-
लोकार्थ धर्मअवडंबर[3]; दृढता स्थैर्य हें स्वधर्मांत." १५

१ रात्रंदिवस, नेहमीं. २ लक्ष. ३ सोंग.

"पैशुन्य हेंच, निंदा दुसऱ्याची; मान सत्य हाच असे-
आत्म्याविषयीं जो अभिमान तया मान नाम हें विलसे."
"जें प्राणिमात्ररक्षण करणें त्यालाचि दान हें नांव;
स्नान तयास म्हणावें पापक्षालन मनांतलें सर्व." १७
"अज्ञानपूर्ण असणें धर्माचें, मोह हाच; दानाचें-
फळ हेंच दैव; इंद्रियनिग्रह हें धैर्य सुज्ञ पुरुषाचें." १८
"संसारासंबंधीं मुख्यत्वें हेतु तो असे काम;
हृदयांत ताप दे जो, मत्सर देतात त्यास बुध नाम." १९
धर्मार्थकाम होणें एकत्र तिन्ही कधीं असे शक्य?
"अनुकूल धर्मपत्नी धर्माला, तेधवां नच अशक्य." २०
अक्षय्य कोण जातो नरकाला? "जो स्वतां गरीबास
बोलावितो, परंतु न देतो भिक्षा तयास, तो खास." २१
"जो धर्मशास्त्रदेवद्विजपितरां वेद यांस जें उक्त
वर्तत नच, धन दुर्व्यय करितो, नरकास जाय तो सत्य." २२
वर्तन, वेदाध्ययनाचि, कुल, वेदज्ञान यांमधें द्विजता
येते खरी कशानें? युधिष्ठिरा! सांग बा मला आतां. २३
"दे न ब्राह्मणता हें कुलादि अवघें अयोग्य सत्य पहा;
एकाचि निःसंशय तें सदाचरण देतसे द्विजत्व अहा!" २४
"तोचि शहाण[1] कीं जो सद्वर्तनि; चार वेद जरि पढला-
दुर्वर्तनी मनुज तो शूद्राहुनि शूद्र दुष्ट तो न भला." २५
कोणाशीं करणें तें सख्य? वदे, भंगभीति ज्या न कदा,
"सज्जनसख्य न पावे भंग कधीं, देत सौख्यमोद सदा." २६
उत्तम साधन आहे धन मिळवायास कोणतें सांग?
"व्यवहार सरळ करणें जपून, हें योग्य मानवां चांग." २७

---

१ ब्राह्मणपणा.

## १५ सत्संगति.

( चाल—अंबरगत परि पयोधरातें. )

असेल इच्छा सार्थक व्हावें जन्माचें तुज जरी
नरा ! झणिं सत्संगति तूं धरीं ॥ ध्रु० ॥
सत्संगानें सत्य बोलणें वाचेला ये सदा,
मिळवितो मनुज कीर्तिसंपदा.
बुद्धीचा जडपणा जाउनी पाप लया जातसे,
चित्त तें आनंदीं रमतसे.
अहंकारमत्सरादि रिपु जे दुःखमूळ, त्यांजला
मिळेना थारा लव वस्तिला !
चाल ॥ हे रिपु ज्या नुरले धन्य मनुज तो असे,
तच्चित्त सहज मग प्रसन्नता वरितसे,
ह्या प्रसन्नतेनें योग्य कार्य घडतसे,
उपकृति करितो दीनजनांवरि सबाह्यअभ्यंतरीं
नरा ! झणिं सत्संगति तूं धरीं. १
काचःकांचनसंसर्गानें[1] मरकत-तेजस्विता[2]
ये पहा काचेला तत्वता,
पुष्पाश्रित जी पिपीलिका ती शंभुशिरीं जाउन
करितसे चंद्राबिंबचुंबन !
संतपंक्तिला दुष्ट बैसला, संत त्यास बोधिती,
अशी ही श्रेष्ठा सत्संगति;
चाल ॥ हरिभजनीं रमतें प्रेमें मन सर्वदा,
सद्ग्रंथपठण हा मिळे सहज फायदा,
त्याकडे न बघतें भवसंकट आपदा,
श्रीरामा ! मी अनन्यभावें शरण तुला अंतरीं,
मला दे सत्संगति झडकरी.

---

१ संगतीनें, संयोगानें. २ पाच नांवाच्या रत्नाचें तेज.

## १६ दशावतार.

( आर्या )

वेदोद्धारचि केला देवा ! त्वां मत्स्यरूप घेऊन;
पृथ्वी रक्षण केली पृष्ठीं वाहून, कूर्म होऊन. १

जलमग्न धरा, तिजला दिधला टेंका कराळदंतानें;
साश्चर्य देव झाले, अद्भुत तव त्या वराहरूपानें. २

अत्युग्र रूप नरहरि धारण केलेंस, रक्षिला बाळ
प्रल्हाद, आणि त्याच्या पितयासी जाहलास तूं काळ. ३

अभिनव बटुवेषानें छळुनी, त्वां घेतलें त्रिपददान-
दैत्येंद्र बळीपासुनि, लीले पाताळ त्यास दावून. ४

परशु करीं घेउनि तूं निःक्षत्रिय एकवीसदां केली-
धरणी, तव तो विक्रम सुरांहि बहुवर्ण्य, परि तुझी केली!५

ज्यानें सुरांस छळिलें, ब्रह्मा सांगे जयास पंचांग,
त्वां राम होउनी त्या दशकंठा स्वर्ग दाविला चांग. ६

कंस असुर वधुनी, नग, गोकुल रक्षूनि, अंगुलीं धरिला !
कृष्णावतार घेउनि चराचरां दाविली अमित लीला. ७

हिंसा कदा करूं नये हा उत्तम धर्म, बौद्ध अवतार--
घेउनि प्रसिद्ध केलें, पृथ्वीचा उतरिलास तूं भार. ८

धर्म स्थापन करिशिल वंद्य सनातन जगांत जो श्रेष्ठ
कल्कीरूपें देवा ! म्लेंछादिक भ्रष्ट ते सकल नष्ट. ९

---

१ क्रीडा, खेळ.

## १७. सफलायु.

श्लोक ( वसंततिलका. )

विद्युत्प्रभा[1]तरल जीवित मानवाचें,
किंवा विलोल[2] जलबुद्बुदसें भ्रमाचें;
आयुष्यचक्र फिरतें, पडता न खंड;
कां व्यर्थ गर्व करिसी मनुजा! प्रचंड ? १
केलें न कार्य बुधमान्य नरा विशेष,
यत्कीर्तिभेरिरव येथ घुमे न शेष;
झालें वृथा जनन श्वा[3]किरिसें तयाचें,
धिग्[4]वाद सर्व करिती, विफलायु साचें. २
अत्यल्प यत्न नलगे वय वाढण्याला,
लागे प्रयत्न परि चित्तविकासनाला;
ज्ञानाब्धि तो सहज शांतिनिधान सिद्ध
होईल, तद्यश चिरं[5]तन सुप्रसिद्ध. ३
आहे जयानिकट बुद्धि-धन प्र[6]भूत,
अज्ञांसि दान उपदेशमिषेंहि देत;
सन्मार्गवर्तन करी इतरांसमेत,
'ज्ञानी' तयास विलसे अभिधा[7]न सत्य. ४
एतादृ[8]श प्रथित[9] वर्ण्य[10] गुणें[10] नियुक्त[11],
तो वंद्य सज्जन जगीं चिरकाल सत्य,
यालाच संत म्हणती 'सफलायु' धन्य,
ते निंद्य जे इतर वर्तनिं बुद्धिशून्य! ५

---

१ विद्युत्प्रभेप्रमाणें चंचल. २ चंचल. ३ कुत्र्याप्रमाणें, डुकराप्रमाणें. ४ तिरस्कार, अपमान. ५ चिरकालीन. ६ पुष्कळ. ७ नांव. ८ असा. ९ प्रसिद्ध. १० वर्णनीय गुणांनीं. ११ प्रवर्तित.

## १८ उपकुर्वाणक ब्रह्मचारी.

( उपकुर्वाणक[1] आणि नैष्ठिक असे ब्रह्मचाऱ्यांचे दोन प्रकार आहेत. त्यांत पहिल्या प्रकारच्या ब्रह्मचाऱ्याचे धर्म, भागवत एकादशस्कंध अध्याय १७ श्लो. २१।३० च्या आधारें खालील कवितांत गोविले आहेत. )

( आर्या. )

विप्रक्षत्रियवैश्यां उपनयनें प्राप्त होय जन्म दुजा,
गमनार्थ योग्य ते मग गुरुसदना प्रपठणार्थ, हें समजा. १

जिंकूनि इंद्रियांना, बोलावुनि सांगतील गुरु तेव्हां
वेदाध्ययन करावें; घ्यावा समजूनि अर्थही केव्हां. २

धारण करणें त्यांनीं कृष्णाजिन, दर्भ, मेखला, माला[2]
यज्ञोपवीत, दंडहि, शिरीं जटाभार योग्य त्या बाला. ३

आसन शुभ्र असावें, क्रीडा बहु विमलतादि विषयांत
कालव्यय न करावा, किंवा मोहूं नये तयें चित्त ! ४

मौनव्रत आचरणें मलमूत्रोत्सर्ग, स्नान, जप, हवन,
भोजन ह्या षट्कर्मीं; नखकचछेदन तया न शुभ जाण. ५

केव्हांहि वा न करणें रेतःपात व्रतस्थ[3] जो त्यानें,
नैसर्गिक पतनाला, प्रणवजप स्नान शुद्ध भक्तीनें. ६

मित्राग्नि[4] वृद्धजन वा गोब्राह्मण मातृपितृ आचार्य
शुचि होउनि सेवावें यांना, चित्तीं धरूनियां स्थैर्य. ७

प्रत्यक्ष ईशमूर्ती गुरु मानावा, कदा न अवमान-
त्याचा अल्प करावा, दोषारोप न तयीं मुळीं जाण. ८

प्रातःसंध्याकालीं भिक्षा वा अन्य प्राप्त जें होय
कथन करावें गुरुला, सत्यत्वें साम्र धरूनियां विनय. ९

---

१ ज्याला पुढें गृहस्थाश्रम घ्यावयाचा असेल तो. २ अक्षमाला. ३ ब्रह्मचारी. ४ सूर्य व अग्नि.

१८२०

गुर्वाज्ञा होइल तें उपभोग्य असे स्वतांस वस्त्रान्न;
जरि अल्प प्राप्त झालें, होऊं देऊं नये मन विषण्ण[1]! १०
गुरुशुश्रूषा करितां, दक्ष असावें मुदान्वित प्रेमें
अतिनीच सेवकासम सेवावें गुरुपदाब्ज तें नेमें. ११
आणूं नये मनीं हा 'मी श्रेष्ठ, गुरू कनिष्ठ वर्णाचा'
कुविचार अल्पसुद्धां; गुरुमहिमा श्रेष्ठ सांगती वाचा. १२
मार्गीं चालत असतां गुरुच्या मागून चालणें इष्ट,
गुरु निजल्यावर निजणें, सावध, बहु दूर ना तसें निकट. १३
क्लांत[2] गुरू होतिल तें चरण तयांचे चुरीत बैसावें;
स्वस्थपणीं बहु दूर न उभें असावें विनम्रताभावें. १४
विद्या समाप्त होई तों पाळावे अखंड हे नियम,
व्रत ब्रह्मचर्य, वर्ज्यचि उपभोग करूनि, साधणें काम[3]. १५

## १९ बोधप्रद आर्या.

हरिनाम घेतल्यानें सतत मुखें, पातकें लया जाती;
अग्निस्पर्शें कापुस विपुल जरी तो टिकेल वेळ किती? १
भक्तीनें वश होतो हरि एका, अन्य साधनें विफल;
सालंकारयुता ती ललना[4] कुंकुमविना न शोभेल! २
प्रेमार्द्रयुक्त भक्ती हरिभजनीं पाहिजे खरी पूर्ण,
इच्छाभोजन मिळतां तृप्ती होते मनीं सहज तूर्ण. ३
व्यभिचारिणी नको ती भक्ती हरिची, तिच्यांत सुख नाहीं;
अन्यासक्ता युवती चतुर तरी निंद्य सर्वथा पाही! ४
सन्मार्गवर्तनानें स्वधर्म पाळील तो जगीं श्रेष्ठ,
पय गोड, त्यांत साखरमिश्रण होणें खरेंच उत्कृष्ट. ५

---

१ खिन्न. २ थकलेले, दमलेले. ३ विद्या. ४ स्त्री.

त्रासद असला तरिही स्वधर्म, मनुजें तया न सोडावें,
ओढाळ गाय म्हणुनी तिजला खाटिककरीं कसें द्यावें ?
असला इतरांपेक्षां वाईट जरी स्वधर्म, परि गोड;
व्यंग-निजसुताचेंही आपण करितां पुरे सकल कोड. ७
दृढश्रद्धया[1] स्वधर्माचरण सदाचार सत्य भाषण तें,
एकाग्र शुद्ध भक्ती करिती हरिची, हरीस प्रिय नर ते. ८

---

## २०. मनोमन साक्ष.

( साकीवृत्त )

धनिक आणि भूपाल उभयतां परम स्नेही होते,
एकमेक सन्मार्गवर्तनीं ईशचिंतनीं रत ते. १
स्वीकृत कर्मीं कुशल दक्ष ते परि सत्पथ-अवलंबें
सारुनि कर्में दोघे भेटत परस्परां अविलंबें. २
भूपाचे जे विचार वर्तन, तेंच असे धनिकाचें,
देह भिन्न, परि अभिन्न होतें मानस त्या उभयांचें. ३
एके दिवशीं भूपमानसीं सहज अकारण आलें--
निजधनभांडागारीं अधुना थोडें धन कीं उरलें. ४
परचक्राचा प्रसंग जरि ये, काय करावें समयीं ?
द्रव्यपूर्ति[2] मग होईल कैशी, दुरवस्था ती येई ! ५
नितान्त[3] आहे धनिक मित्र मम धनयुत, त्यास लुटावें !
विचार ये हा तोंच दचकला भूप मनीं सम भावें. ६
हर हर ! आली काय मानसीं कृतघ्नता ही ऐशी;
परम मित्र मत्प्राणचि दुसरा धनिक होय गुणराशी. ७

---

१ दृढश्रद्धेनें. २ धनाची पूर्णता. ३ अतिशय.

याच क्षणिं ये विकल्प कीं त्या धनिकाच्याहि मनांत!
चंदनकाष्ठा ग्राहक न मिळे, मम सन्निध हीं बहुत. ८
महार्ह[1] काष्ठें एका वेळीं अवघीं हीं घेण्याला
समर्थ कोणि न, काय करावें ग्राहक जन मिळण्याला? ९
भूप निधन पावेल तेधवां काष्ठें हीं विकतील!
दहनास्तव त्याजला खरोखर सहज सर्व खपतील! १०
विचार हा ये तोंच दचकला धनिक मनीं सच्छील!
दीर्घायु करीं देवा! माझा सरलहृदय भूपाल. ११
प्राणसखा मत्श्रेष्ठ भूप, त्याविषयीं कां ही असली–
अशुभ कल्पना घोर मन्मनीं एकाएकीं आली? १२
विषण्णहृदयें[2] धनिक जाउनी तत्क्षणिं भूपा वदला
तव विषयीं का अशुभ विचारें स्पर्श आज मज केला?
भूपें कथिलें स्वीय मनोगत तें धनिका साद्यंत,
सुज्ञ उभयतां मनीं उमजले, झणीं जाहले शांत! १४
चिंतावें अन्याचें आपण तेंच आपणांविषयीं
तन्मनिं तत्क्षणिं येतें, यास्तव सच्चिंतन मनिं ठेवी! १५
मनुजा, आहे सर्वांतरिं तो आत्मा एकचि सत्य!
म्हणुनि "मनोमन साक्ष" कथानक वागवीं नित्य! मनीं १६

---

## २१ प्रत्यक्ष प्रमाण.

(आर्या.)

श्मश्रु कराया बसला सेनापति शूर एकदां एक
डोकें किंचित् चिरलें त्याचें म्हणुनी असें वदे वाक्य- १

---

१ मौल्यवान. २ खिन्न.

[stamp]

तव हलगर्जिपणानें हें चिरलें रे ! नापिता मदीय शिर;
ऐसें म्हणुनी कांहीं रागें भरला तयास तो वीर. २
स्तब्ध न बसला तेव्हां नापित हें वीरवाक्य परिसून,
वाचाळपणें त्यानें दिधलें उत्तर तयास खोंचून. ३
लागे अल्प क्षुर[1] हा असह्य झाला तुम्हांस, मग समरीं--
खड्गाघात कसे ते सहतां सरकार घोर बहुत तरी. ४
त्या नीच नापिताचा हा असहिष्णुत्वदोष वीरानें
क्षणभर उदरीं ठेवुनि होउं दिलें श्मश्रुकर्म धीरानें ! ५
श्मश्रू संपवुनी ते दोघे उठले, तयें तदावसरीं-
नापितपदावरी निजपद ठेवूनी धरून भल्ल[2] करीं, ६
त्या वीरानें वेगें स्वपदा नापितपदास भेदून,
भूमींत वीतभर तो भल्ल खुपसिला मनांत हर्षून ! ७
'सरकार, काय हो हें !' शंख करूनी वदे प्रचंडपणें-
नापित, तेव्हां वीरें म्हटलें गा परिस तूं प्रशांत मनें ! ८
आम्ही शूर शिपाई समरीं कारितों कसे सहन घाव,
पृच्छा ही त्वां केली, कथिलें तुज चांगलें, मनीं ठेव ! ९
ऐसें म्हणुनी वीरें भल्ल उपटुनी, तयास खाण्याला,
बांधवुनी जखम, दिलें सांजाघृत रोज, तो बरा केला ! १०

---

## २२ योग्य उपदेशक.

( चाल—अंबरगत परि पयोधरातें. )

बोध कराया जनांस अवघ्या योग्य सबाह्यांतरीं
पाहिजे अधिकारी नर तरी ॥ ध्रु० ॥

---

१ क्षुर म्हणजे वस्तरा. २ भाला.

मदिरापाननिषेधीं करितो सभेंत भाषण; घरीं-
चोरुनी मदिराप्राशन करी !
'परधन परकांतेला माना विष माता' बोधिती
स्वतः जे तद्व्यसनीं गुंगती !
चाल—हे वक्ते होतिल वंदनीय कां जनीं ?
उपदेश सफल का होइल त्यांचा जनीं !
अक्षम्य दोष हे करिती समजुनि मनीं !
विद्याभूषित विद्वन्मणि हे वक्ते असले जरी
सर्वदा त्याज्य खरोखर तरी ॥ १ ॥
परदोषाविष्करण[1]कार्य बहु इष्ट, तया पाहिजे
अवश्यक सहिष्णुत्व[2] योग्य जें;
अनहंकारें मधुर भाषणें जो हें करितो जनीं
कार्य, तो थोर वंद्य वर्तनीं;
चाल—क्रोधानल नुसता नच उपयोगीं पडे,
अध्यात्मज्ञानीं क्रोधचि भारी नडे,
समचित्त ठेविल्या पडेल नच सांकडें,
अज्ञां घेउनि उक्त पथानें नित्य गमन जो करी
संत तो धन्यचि या भूवरी ॥ २ ॥
चित्तीं शब्दीं क्रियेंत ज्याच्या एकरूपता सदा
महात्मा वंदनीय जनपदा.
अन्य होत ते जननिंदेला पात्रचि उपदेशक
करिति जे बोध जनां शाब्दिक !
चाल—हें ठेवुनि चित्तीं कार्य करावें जनीं,
परदोषचि केवळ आणावे ना मनीं,
निजदोष अगोदर सुधारणें शोधुनी !

---

१ दुसऱ्याचे दोष प्रगट करण्याचें काम. २ सहनशीलता.

हें नच होइल, मौन धरावें ‘ शुष्क बोधकें ’ तरी
शांतता ठेवुनि निज अंतरीं ! ॥ ३ ॥

---

## २३ पुस्तकी ज्ञान.

व्याकरणशास्त्रपारंगत[1] विद्यार्थी नवीन पढलेला,
गुर्वाज्ञा घेऊनी स्वग्रामा चालला, मनीं धाला. १
दिनराज अस्त झाला, एका ग्रामीं निवास करण्याला
गेला; ग्रामाबाहिर मंदिर होतें तयांत तो ठेला. २
ग्रामांत वृत्त कळलें, जमले जन, विनविलें तया त्यांनीं,
एथें निवास योग्य न, ग्रामांत चला सुख निजा रजनीं. ३
व्याघ्र भयंकर येतो मोठ्या रात्रीस, भक्षितो पथिका,
यास्तव तुम्हांस कथितों पांथमहाराज ! एथ राहुं नका. ४
वैयाकरणी[2] होता पांथ[3], करी अर्थ व्याघ्र शब्दाचा,
“ आघ्रायते विशेषेण व्याघ्र सः ” अशी वदे वाचा ! ५
घेतो विशेष जो कीं वास तया व्याघ्र नाम शास्त्रांत,
सांगून अर्थ लोकां पांथ म्हणे अल्प भीति ना यांत. ६
ग्रामांत येत ना मी, जावें सदनीं[4] तुम्हीं सकल लोक,
गंध न व्याकरणाचा, म्हणून वदतां असें भयद वाक्य ! ७
निरुपाय सर्व होउनि जन गेले, पांथ झोंपला शयनीं,
व्यवहारशून्य, त्यातें व्याघ्रें येऊन भक्षिलें रजनीं ! ८

---

१ तयार. २ व्याकरणशास्त्रवेत्ता. ३ प्रवासी. ४ घरीं.

## २४. पारमार्थिक बोध.

( आर्या. )

श्रीराम जानकीधव रघुकुलभूषण विभो ! कमलनयन;
युष्मत्पदांबुजातें करितों सद्भावयुक्त मी नमन. १
मानवजन्म खरोखर आहे दुष्प्राप्य बहुत या जगतीं,
स्तवनमनन ईशाचें करण्याला, मिळविण्यास चिरशांती. २
रजनीनाथ[1] दिवाकर[2] करिती संचारकर्म संतत ते;
मनुजें म्हणुनि करावें ईशभजन नित्य, हें उघड होतें. ३
जन्मा येऊनि सार्थक सत्कीर्तीनें उरेल चिर त्याचें.
जीवंत तोचि मानव. भात्यासम इतर काय कामाचे ! ४
रक्षण निजधर्माचें सत्यत्वें करुनि, ईशभजनाला
प्रेरित जनमति करितो, सद्गुरु तो खचित वंद्य जगताला. ५
मद-मत्सरादि अरिवर[3] छळिती भ्रमविति, नरा ! सुसावध हो.
अत्यंत दुष्ट बा हे, यांच्यापासूनि दूर मन राहो. ६
साधुसुजन मार्गानें वागावें सतत ईशपद ध्यावें.
वेदांतवाचनानें मन संस्कृत होय खास समजावें. ७

## २५. श्रीब्रह्मानंदस्वामी.

( चाल–भूपती खरें तें० )

श्रीयतिवर ब्रह्मानंद ब्रह्मगांवांत[4]
अवतरुनि तारिले मूढ, कुमार्गी पतित;
लाभलें तुम्हांला बालपणीं वैराग्य,

१ चंद्र २ सूर्य. ३ मोठे शत्रु. ४ हें गांव अहमदनगर जिल्ह्यांतील जामखेड पेट्यांत आहे.

बहु तुच्छ मानिले तुम्हीं विषय उपभोग्य;
मिळविलें अगाधाचि वेदांतीं प्रावीण्य,
परमेशभक्ति, एकाग्र यांत नैपुण्य;
भो ! युष्मद्रूपें प्रभु येथें अवतरला,
मग काय उणें हो तुम्हांस सांगा मजला;
(चाल बदलून) मी शरण तुम्हां हो स्वामी । पाहि मां,
नच दूर करा मज स्वामी । पाहिं मां,
अघ नष्ट करा मम स्वामी । पाहि मां,
भो कृपासागरा ! लीन पदीं मी सतत,
चिरसौख्य मला द्या, आन मनीं नच हेत. १

दास,
शंकर श्रीधर धनेश्वर.

REFBK-0001820
REFBK-0001820

१ प्रस्तुत स्वामींचें विस्तृत, हृदयंगम व वेदांतविचारप्रचुर गद्यात्मक चरित्र, मुमुक्षूच्या तारीख १ माहे मे सन १९१३ इ. च्या अंकांत मी प्रसिद्ध केलें आहे, तें भावकांनीं अवश्य पहाण्याची कृपा करावी.



